पुण्य नगरी

# आरोग्यजागर

। उत्तम आरोग्य । उज्ज्वल भविष्य । पुणे, मंगळवार, ७ जुलै २०१५





# Ulcerative Colitis आणि होमिओपॅथिक उपचार

Ulcerative Colitis हा एक मोठ्या आतड्यांचा गंभीर स्वरूपाचा आजार आहे. यामध्ये मोठ्या आतड्याला सूज येउन दाह निर्माण होतो आणि आतड्याच्या आतील स्तरावर व्रण तयार होतात. त्यामुळे सतत अधून मधून जुलाब होणे, जुलाबावाटे रक्तस्राव होणे अशा तक्रारी उद्‌भवतात. Ulcerative Colitis परत परत उद्‌भवणारा आजार आहे. या आजाराचे ठोस असे कारण नाही, असे ॲलोपॅथिक चिकित्सा तज्ज्ञांचे मत आहे.

मात्र, होमिओपॅथीत डॉ. सेम्युअल हेनिमान (होमिओपॅथी जनक) यांनी जगातील सर्व आजारांचे मूळ कारण शोधून काढले आहे; ते म्हणजे 'Miasm'. Ulcerative Colitis या भीषण आजाराचे Syphilis Miasm हे कारण असून त्यावर होमिओपॅथिक उपचार कसा करायचा हे देखील सांगितले आहे.

**लक्षणे :**

१. रक्तमिश्रीत, श्लेष्मिश्रीत जुलाब वारंवार आणि दीर्घकाळ होणे.
२. सतत रक्तस्राव झाल्यामुळे अनेमिया होणे.
३. वजन घटणे.
४. पोटात कळ मारणे. बेचैनी होणे.

आतड्याबाहेरील लक्षणे :

१. सतत तोंड येणे.
२. डोळ्यांच्या आतील पडद्यावर सूज व दाह निर्माण होणे.
३. सांधेदुखीचा त्रास उद्‌भवणे.
४. त्वचेवर व्रण तयार होणे.
५. रक्त वाहिन्यात गुठळ्या होणे.
६. नखे निकृष्ठ होणे.
७. फुप्फुसांमधील रक्त वाहिन्यातील अडथळा झाल्यामुळे श्वासोच्छवास अपुरा पडणे.

Ulcerative Colitis हा मोठ्या आतड्यात काही काही भागांमध्ये होतो. जर हे अल्सर गुदद्वाराच्या वरच्या आतड्यात असतील तर त्याला Proctitis म्हणतात, जर त्याच्या आणखी वरच्या भागात असतील तर त्याला Proctosigmoiditis म्हणतात. जर हे व्रण मोठ्या आतड्याच्या तोंडापासून ते लहान आतड्याच्या सुरुवातीपर्यंत असतील तर त्याला Pancolitis म्हणतात. आजाराचे वर्गीकरण लक्षणांच्या तीव्रतेनुसार पुढीलप्रमाणे केले जाते.

Mild Ulcerative Colitis : : दिवसातून ४ पेक्षा कमी वेळा जुलाब होणे, जुलाब रक्तमिश्रीत असणे किंवा नसणे. पण त्यामुळे पेशंट खूप त्रासलेला दिसत नाही.

Moderate Ulcerative Colitis : : दिवसातून ४ पेक्षा जास्त वेळा जुलाब होतात. थोड्या प्रमाणात ताप येतो. मध्यम प्रमाणात रक्तक्षय होऊन रुग्ण थकलेला दिसतो, वजन घटते आणि भूख मंदावते.

Severe Ulcerative Colitis: - दिवसभरात ६ पेक्षा जास्त वेळा जुलाब होतात. सतत संडास वाटे रक्त पडल्यामुळे रक्तक्षय होतो. नाडीचे ठोके वाढतात. सतत ताप येऊ लागतो. पेशंट खूप कृश दिसू लागतो.

Fulminent Ulcerative Colitis: - सतत गुदद्वारातून रक्त स्त्राव होतो. दिवसभरातून १० पेक्षा जास्तवेळा जुलाब होतात. आतड्याच्या जखमा फक्त आतल्या स्तरावरच नाही तर बाहेरील स्तरावर देखील दिसून येतात. आतड्यावर व्रण पडून छिद्र पडते. Perforation त्यामुळे रुग्ण अत्यवस्थ होतो.

कारणे : ह्या आजाराचे ठोस कारण माहित नाहीये . तरीही कारणांची शक्यता सांगितली आहे.

१. जनुकीय (Genetic) कारणे : एकाच कुटुंबात बऱ्याच व्यक्तींमध्ये हा आजार आढळून येणे. कुटुंबात Autoimmune Disease आढळून येणे. (Autoimmune disease) म्हणजे नैसर्गिक प्रतिकारक्षमता स्वतःचे काम विसरून स्वतः च्या शारीराविरुद्ध लढू लागते आणि शरिराचा सातत्याने क्षय करते. )

२. आहार, जीवनसत्व इ., स्निग्ध पदार्थांचे अति प्रमाणात सेवन, मांसाहार , दूध व दुग्धजन्य या अन्न घटकांनी Ulcerative colitis ला सुरुवात झालेली दिसून आलली आहे.







## होमिओपॅथी चिकित्सा व उपचार

**डॉ. अमरसिंह निकम**

निदान :

१. ह्या आजाराचे निदान एंडोस्कोपी करून मोठ्या आतड्याची बायोप्सी (मांसाचा छोटासा तुकडा) काढून करून केले जाते.
२. त्याचबरोबर रक्ताची तपासणी करून होमिग्लोबीनचे प्रमाण एरफ् उफ्ढ वरून आजाराची तीव्रता लक्षात येते.
३. विष्ठेची तपासणी करून विषाणू संसर्ग लक्षात येतो.

**केसः-**

Ulcerative Colitis मुळे वैतागून गेलेल्या ४७ वर्षांच्या क्लासवन ऑफीसरची ही केस आहे. गेले ३ वर्षे ते ह्या आजारामुळे त्रस्त होता आणि कुठल्याच औषधांनी त्यांना फरक पडत नव्हता. दिवसभरातून साधारणपणे २० ते २२ वेळा जुलाब होत असल्यामुळे त्याचे कामावर दुर्लक्ष होऊ लागले होते. माजी विद्यार्थी रुग्णाला या अवस्थेत माझ्याकडे तपासणीसाठी घेऊन आली.

**तक्रारी :**

१. ३ वर्षांपासून सतत जुलाब होणे.
- पोटात गोळा येवून रक्त मिश्रीत जुलाब दिवसभरात २० ते २२ वेळा होणे.
२. सतत थंडी वाजून ताप येणे.
- तापात तहान वाढलेली, तापानंतर चेहऱ्यावर, डोक्यात आणि छातीवर थंड घाम येणे.
३. पायांवर पांढरे डाग ६ वर्षांपासून
- पांढऱ्या डागांना सुरुवात डाव्या हातावर मग अजव्या हातावर नंतर अजव्या पायावर मग डाव्या पायावर अशी झाली.
४. डोकेदुखीचा जुनाट त्रास
- अपुऱ्या झोपेमुळे, मानसिक थकव्याने आणि उन्हामुळे डोकेदुखी होणे.

**विशेष माहिती :**

१. तंबाखू सेवनाची सवय.
२. खाण्यात तिखट, मांसाहाराची , फळांची आवड.
३. जास्त प्रमाणात थोड्या थोड्या वेळात तहान लागणे, घश्याला कोरड पडणे.
४. स्वस्थ झोप न लागणे, झोपेत पायात गोळे येणे, थंडीच्या दिवसांत जास्त प्रमाणात गोळे येणे.
झोपेत कामाची स्वप्न पडणे.
५. पाच वर्षांपूर्वी सदीर्चा जुनाट त्रास होता जो औषधांनी दडपला गेला होता.
६. थंड प्रकृती.

**स्वभाव :**

रुग्णाचे व्यक्तीमत्व अतिशय नीटनेटके होते. बोलण्यात सुसज्जपणा आणि स्पष्ट वक्तेपणा होता. त्यांना मी विचारले तुमचा स्वभाव कसा आहे ? त्यावर रुग्णाने सांगितले की, लोकांना वाटते मी रागिष्ट आहे पण कारणाशिवाय मी रागवत नाही, मी सुपरवायजर आहे. जर मी रागावलो नाही तर लोकांना शिस्त लागणार नाही.

**1. तुमचे लहानपण कसे होते ?**

- माझा स्वभाव खूप तापट होता मला क्रिकेट आणि स्विमिंगची खूप आवड होती. मला अंधार आणि सापाची भीती वाटत असे.

**२. तुमच्या शैक्षणिक जीवनाची माहिती द्या.**

- मी मॅकेनिकल इंजिनियरचा डिप्लोमा केला आणि १९ व्या वर्षी काम करू लागलो. मी कामात खूप प्रामाणिक होतो त्यामुळे माझी बढती लवकर झाली.

**३. तुमच्या कामासंबंधीची माहिती द्या ?**

- मला माहिती आहे की मी केलेल्या कामाचा मोबदला मिळतो त्यामुळे मी खूप कष्ट करतो. माझ्या हाताखाली काम करणाऱ्या लोकांनी चुका केल्यावर मी त्यांची तक्रार मॅनेजरकडे करतो.

**४. तुमच्या आयुष्यातील ताणयुक्त प्रसंग कोणता ?**

- १० वर्षांपूर्वी माझा मेव्हणा अपघातात वारला तेव्हा मला खूप धक्का बसला. कारण त्याच्याशी माझे खूप चांगले संबध होते. तीन वर्षांपूर्वी आमच्या संस्थेतील ३५ लोकांना काढण्यात आले. त्यामुळे माझ्यावर कामाचा खूप ताण पडला. सुट्टीच्या दिवशी सुद्धा आम्हाला काम करावे लागते. या ताणामुळे शारीरिक तक्रारी सुरू झाल्या.

**संपूर्ण व्यक्तीमत्व :**

१. चोखंदळपणा
२. शिस्तप्रिय
३. रागिष्ट
४. मेव्हण्याच्या मृत्युचे दुख
५. कष्टाळू

**प्रतिसाद :**

वरील लक्षणे लक्षात घेऊन मी रुग्णाला एकच होमिओपॅथिक औषध सुरू केले. एका आठवड्यात त्याची जुलाबाची तीव्रता दिवसाला ५ ते ६ एवढी कमी झाली. जुलाबावाटे रक्त पडणे, ताप येणे, बंद झाले. त्याचा अशक्तपणा कमी झाला. जुलाबाबरोबर त्याच्या शरिरावरील पांढरे चट्टे कमी झाले. पुन्हा एकदा विष्ठेची तपासणी केल्यावर पु पेशी आणि रक्तपेशी नाहीशा झाल्या. ४ ते ५ महिन्यांत रुग्णाचे वजन सुद्धा वाढले. आजार पूर्ण आटोक्यात आला. रुग्णाचा आनंद आणि उत्साह वाढला. तो नव्या जोमाने कामावर रुजू झाला.

**पत्ता – आदित्य होमिओपॅथिक हॉस्पिटल ॲण्ड फिलिंग सेंटर, तपोवन रोड, पिंपरी गाव, पुणे–१७.**
**संपर्क – ०२०–६९३३७०८०, २७४१२५४९, २७४१२१९७**

# चैतन्यनगरीत कचऱ्यापासून खत



**आमची सोसायटी**

**संकलन : श्याम सावंत**

**। पुणे : प्रतिनिधी**

वारजेतील चैतन्यनगरी फेज २ परिसरात कचऱ्यावर प्रक्रिया करून खत तयार करण्यात येणार आहे. सोसायटीत तयार होणाऱ्या ओल्या कचऱ्याचे रूपांतर गांडूळ खतात होईल. कचरा प्रक्रिया संयत्राचे उद्‌घाटन आज नगरसेवक सचिन दोडके, जनसेवक कैलास दांगट, विभागीय आरोग्य निरीक्षक पी.पी. श्रीश्रीमाळ यांच्या हस्ते करण्यात आले. पुणे शहरात सध्या कचऱ्याचा प्रश्न तीव्र झाला आहे.





ओला कचरा संयंत्राचे उद्‌घाटन करताना नगरसेवक सचिन दोडके, कैलास दांगट, आरोग्य अधिकारी पी.पी. श्रीश्रीमाळ.

**उरूळी देवाची येथे पुणे शहरातील कचरा टाकण्यास नागरिकांचा प्रचंड विरोध आहे. त्यामुळे प्रभागात निर्माण होणारा कचरा त्याच ठिकाणी जिरविण्याचे आवाहन पुणे महापालिकेतर्फे करण्यात आले आहे. त्याला वारजे – माळवाडी परिसरातील सोसायट्यांचा चांगला प्रतिसाद लाभत असल्याची माहिती नगरसेविका भाग्यश्री दांगट यांनी दै. पुण्यनगरीच्या प्रतिनिधीशी बोलताना दिली.**

आरोग्य निरीक्षक ऋतुराज दीक्षित, सोसायटीचे अध्यक्ष प्रदीप खरे, गौतम कुलकर्णी यावेळी उपस्थित होते. येत्या दि. १ ऑगस्टपासून क्षेत्रीय कार्यालय स्तरावर ओला कचरा घेणे बंद करण्यात येईल. ओला व सुका कचरा वेगळे करण्याचे प्रमाण याच प्रभाग ३० मध्ये लक्षणीय आहे. मेघवर्षा, गार्डन सिटी, गार्डन फ्लोरा, राहुल पार्क राहुल निसर्ग, तेजोवलाय, नादब्रम्ह, ओवाळ नेस्ट, पाश्चिमरंग, पश्चिमनगरी आदी प्रमुख सोसायट्या व सहकारी संस्थात अशा अद्ययावत मशीन, गांडूळ खत प्रकल्प प्रभावीपणे कामे सुरू आहेत. सुमारे चार लाख रुपये किमतीची ही मशीन असून, कचऱ्याची क्षमता दिवसाला ६० किलो कचरा (१२० कुटुंब) अशी आहे. या सोसायटीत तयार होणार सर्व प्रकारच्या ओला कचऱ्यावर प्रक्रिया होणार आहे. ओला, सुका कचरा वेगळे करताना चुकून एखादी प्लास्टीक किंवा धातूचा तुकडा या यंत्रात गेल्यास मशीन त्यास विलग करून बाहेर टाकेल. किंमत जास्त जरी वाटत असली तरी ही फक्त एकदाचीच गुंतवणूक आहे. इतर मशीनला वीज बिलाचा खर्च मोठा आहे. ही मशीन चोवीस तास चालू राहिली तरी याला केवळ दिवसाला ३ युनिट वीज वापरली जाते. यात टाकलेल्या ओल्या कचऱ्याचे साधारण १५ दिवसांत खतात रूपांतर होते. हे खत बागेत, शेतात वापरता येते. तसेच हे खत विकून उत्पन्नही मिळवता येते.





# सैनिकांसाठी कमांड हॉस्पिटलमध्ये 'पेट' तंत्रज्ञान

## ▌ कर्करोगासह इतर आजारांचे होणार निदान

**। पुणे : प्रतिनिधी**

सैनिकांचे आणि त्यांच्या कुटुंबीयांचे कर्करोगाचे निदान पहिल्या टप्प्यातच व्हावे यासाठी अत्याधुनिक 'पेट' या नवीन निदान तंत्रज्ञान असलेल्या वैद्यकीय उपकरणाचे सैन्यदलाच्या दक्षिण मुख्यालय येथील कमांड हॉस्पिटलमध्ये उद्‌घाटन झाले. सैन्यदलाच्या दक्षिण मुख्यालयाचे मुख्य लेफ्टनंट जनरल अशोक सिंह यांच्या हस्ते 'पॉझिट्रॉन इमिशन टोमोग्राफी' (पेट) या यंत्रणेचे उद्‌घाटन करण्यात आले आहे.

एमआरआय किंवा सीटी स्कॅनमध्ये कर्करोग हा आजार शेवटच्या स्टेजला आल्यावर समजतो, मात्र आधुनिक तंत्रज्ञानयुक्त अशा पॉझिट्रॉन इमिशन टोमोग्राफी (पेट) मुळे अगदी सुरुवातीच्या टप्प्यात असणारे कर्करोग, हृदयरोग आणि





न्यूरोलॉजीमधील आजारांचे निदान करता येते. राज्यात सैन्यदलाच्या हॉस्पिटलमध्ये केवळ दोनच ठिकाणी हे मशीन आहे. या उपकरणाद्वारे आठवड्याला किमान ५० रुग्णांची तपासणी करण्याची क्षमता आहे. त्यामुळे सैनिकांस त्यांच्या कुटुंबातील सर्वांची या उपकरणाद्वारे तपासणी करणे शक्य होणार आहे.

पेट ही नौदलाच्या मुंबईजवळील अश्विन येथेदेखील यापूर्वीच बसविण्यात आली असून, पुणे येथील सदर्न कमांड हॉस्पिटलमध्ये ही यंत्रणा बसल्यामुळे तिन्ही दलाच्या महाराष्ट्र, गुजरात, तेलंगणा, मध्य प्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक या राज्यांतील आजी-माजी सैनिक व त्यांच्या कुटुंबीयांना याचा लाभ घेता येणार आहे. पेट यंत्रणा पुणे येथील कमांड हॉस्पिटल येथे उभारण्यासाठी संरक्षण मंत्रालयातर्फे १४ कोटींचा निधी देण्यात आला होता. पेट मशीनची किंमत ९.५ कोटी असून, कंपनीतर्फे १० वर्षे देखभाल व दुरुस्ती खर्चदेखील पुरविला जातो, अशी माहिती मुखर्जी यांनी दिली.

# आपलं व्यासपीठ

## व्यसनांपासून दूर राहा...



आजकाल अनेक लोक व्यसनांच्या आहारी गेलेले आहेत. अनेक लोक विविध प्रकारे व्यसन करू लागले आहेत. तंबाखू, विडी, सिगारेट, गुटखा मावा, पानमसाला मावा या पदार्थांचे सेवन करणारा मनुष्यप्राणी विविध ठिकाणी आढळतात. या सर्व विषयुक्त पदार्थांमुळे सेवन केल्यास तोंड व घसा यासारखे नाजूक अवयवांना कॅन्सरसारखे आजार होतात. शारीरिक दुष्परिणाम होतात. असे सर्वाधिक रुग्ण महाराष्ट्रात आढळतात. दारू व ताडी पिणारी लोकांची संख्या आढळते. दारूमध्ये विविध विषारी पदार्थांचा व रसायनांचा वापर केला जातो. अशा विषारी द्रवपदार्थांपासून दारू तयार करून लोकांना सवय लावतात. लोकांना दारू पिण्याची सवय लागली की, ती कधीच सुटत नाही. या वाईट व्यसनांमुळे लोकांचे जीवन बरबाद झाले, तर काहींचा संसार उघड्यावर आला आहे. या व्यसनामुळे शरीरावर परिणाम होऊन यकृत व किडनी यासारखे अवयव निकामी होतात. माणसाचे जीवन धोक्यात येते. त्याचे जीवन तेथेच संपते. माणसाला व्यसनाधीनतेचा शाप लागला असून, अशा व्यसनांपासून दूर राहण्याकरिता माणसांमध्ये सदैव जनजागृती केली पाहिजे. वाईट व्यसनांपासून दूर राहून नव्या जीवनाला सुरुवात करावी. अशा या वाईट सवयीऐवजी एक टाइमपास म्हणून बडीशेप, खडीसाखर, वेलची, लवंग या पदार्थांचे सेवन करा. आपल्या शरीराला ते लाभदायक आहे. म्हणूनच सर्वत्र व्यसनांपासून दूर राहा, अशी जनजागृती करणे गरजेचे आहे.

**रामचंद्र पोतदार, बारामती**

**टीप :** आपल्या परिसरातील समस्यांबाबत आपली मते १०० ते १५० शब्दांत आपल्या छायाचित्रासह व पत्त्यासह खालील पत्त्यावर पाठवावीत.

पत्ता : दैनिक 'पुण्य नगरी' बहिरट पाटील आर्केड, दुसरा मजला, बालगंधर्व चौक, शिवाजीनगर, पुणे – ५. Email : ambika.pune@gmail.com

**शहरातील महत्त्वाच्या कॉलेजपैकी असलेल्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या फर्ग्युसन महाविद्यालयाला काल हेरिटेजचा दर्जा देण्यात आला. त्यामुळे पुण्याच्या कॉलेजविश्वात आनंदाचे वातावरण आहे. हेरिटेजचा दर्जा मिळविण्यासाठी संस्था दहा वर्षांपासून प्रयत्नशील होती. या दर्जामुळे पायाभूत सुविधा, शैक्षणिक आणि प्रशासकीय सुधारणा करण्यास वाव मिळणार आहे. एफसीच्या विद्यार्थ्यांमध्येही यामुळे आनंदाचे वातावरण असून, त्यांच्या या प्रतिक्रिया...**

**यूथ Talkers**

**सनील गाडेकर**

### सर्वांच्या प्रयत्नांचे यश



गेल्या १३० वर्षांपासून एफसी कॉलेज शिक्षणासह विविध क्षेत्रांत काम करीत आहे. हे कॉलेज इतिहासाची परंपरा असलेली वास्तू आहे. येथील ॲम्फी थिएटर अनेक चळवळींचे केंद्र आहे. देशहिताच्या अनेक बैठकी त्यात झाल्या आहेत.

**– शिवाजी जाधव**

### मूलभूत सुविधा सुधाराव्यात



एफसी कॉलेजचे पूर्वीपासूनच खूप मोठे नाव आहे. त्यातच आता त्याला हेरिटेजचा दर्जा मिळाला ही खूप आनंदाची बाब आहे. मात्र आता कॉलेजने मूलभूत सुविधांवरही भर दिला पाहिजे. दर्जा मिळाल्यामुळे मूलभूत सुविधाही सुधाराव्यात. विद्यार्थ्यांना चांगल्या सुविधा पुरविल्यास कॉलेजमधील वातावरण चांगले राहील.

**– मोहम्मद सैफ**

### गौरवाचा क्षण



प्रत्येक क्षेत्रात विशेष प्रावीण्य असलेल्या व अनेक ऐतिहासिक घटनांचा वारसा लाभलेल्या महाविद्यालयाचे विद्यार्थी म्हणून आमच्यासाठी हा क्षण अत्यंत गौरवाचा आहे. महाविद्यालयाच्या संवर्धनासाठी व भविष्यात असंख्य विद्यार्थ्यांना महाविद्यालयाचा अधिक चांगल्या प्रकारे उपयोग घेता यावा, यासाठी मिळालेला हा दर्जा व अनुदान महत्त्वाचे आहे.

**–मयूर आव्हाड**